शनिवार दि.२५ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २६७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# उद्धव ठाकरेंनी घेतलेला एक तरी निर्णय दाखवा-देवेंद्र फडणवीस यांचा निशाणा

## अभ्यासक्रमात मनाच्या श्लोकवरही भूमिका केली स्पष्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

उद्धव ठाकरे यांनी फाईलवर केलेला एक तरी निर्णय दाखवा, त्यांनी आजपर्यंत काहीही केले नाही. असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. डोंबिवली येथील घटनेनंतर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने राज्य सरकारवर टीका करण्यात येत आहे. याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. कोणतेही उद्योग एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर हलवणे हे सोपे काम नाही. या संदर्भातील कोणताही निर्णय हा एका दिवसात होऊ शकत नाही. मात्र, या संदर्भात बऱ्याच वर्षापासून चर्चा सुरू आहे. या सर्व उद्योगांना पर्यायी जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. या संदर्भात राज्य सरकार पुढाकार घेणार असल्याची माहिती देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

डोंबिवली येथील केमिकल कंपनीमध्ये झालेल्या स्फोटावरुन राज्यात सध्या राजकारण चांगलेच तापले आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. तसेच पुणे हिट अँड रन प्रकरणी देखील विरोधक राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. या प्रकरणात पोलिस योग्य कारवाई करत असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हणाले आहे. इतकेच नाही तर बाल न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्या निर्णयाच्या विरोधात जाऊन पुन्हा अपील करत निर्णय बदलला असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या प्रकरणी अतिशय कडक कारवाई झाली आहे. मात्र, प्रत्येक गोष्टीचे राजकीयकरण करणे, हा उद्योग सुरू आहे, हे योग्य नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.राज्य मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना भाषा विषयात मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेचा बारावा अध्याय शिकवला जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, 'एससीईआरटी'ने राज्याचा शालेय अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला आहे. त्यावर आक्षेप आणि सूचनाही मागवण्यात आल्या आहेत. यावर देखील देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये मनाचे श्लोक हे वर्षानुवर्ष बोलले जातात, ऐकले जातात, ते अभ्यासक्रमात आहेत की नाही हे मला माहित नाही. मात्र, या संदर्भात वक्तव्य करून विनाकारण संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे

### सिंदखेड राजा येथे सापडलेल्या शिव मंदिर परिसराचे


# शास्त्रशुद्ध पद्धतीने उत्खनन व संवर्धन व्हावे-इतिहास अभ्यासकांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे या नगरीमध्ये चालुक्य, यादव कालीन वास्तू आढळतात. राजे लखुजीराव जाधव यांच्या समाधी स्थळासमोर काम सुरू असताना पुरातत्व विभागाला शिव मंदिराचे अवशेष सापडले बहुदा हे मंदिर चालुक्य कालीन असावे असे इतिहास अभ्यासकांचा प्रथमदर्शनी अंदाज आहे याचं परिसरात राम बारव नावाची बारव होती असा ऐतिहासीक दस्तावेजात उल्लेख आढळतो तरी या मंदिराचे सिंदखेड राजा नगरीतील ऐतिहासीक स्थळांचे उत्खनन व्हावे अशी मागणी सर्व इतिहास प्रेमींची आहे.

स्थानिक सिंदखेडराजा इतिहास अभ्यासक सुमित खांदवे पाटील, मयुरेश खेकाळे, लक्ष्मीकांत जावळे, ज्येष्ठ सिंदखेड राजा इतिहास अभ्यासक छगन झोरे हे सर्व मिळून या ठिकाणावर अभ्यास करून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे यांच्या या अभ्यासामुळे मातीआड ऐतिहासिक सिंदखेड राजा इतिहास सर्वांसमोर येईल.त्यामुळे सर्वच मंडळींची या परिसरात शास्त्रशुध्द पध्दतीने उत्खननाची मागणी करण्यात येत आहे.तरी पुरातत्व विभागाने यात लक्ष द्यावे व ऐतिहासिक मातृतिर्थ सिंदखेरा जाचा मातीआड असलेला अपरिचित इतिहास जगासमोर आणावा.



### दिक्षा जावळे १२ वी परिक्षेत छत्रपती शाहू महाराज विद्यालयामधुन

# कला शाखेत ९२.३३% गुण घेऊन द्वितीय क्रमांकसह उतीर्ण

लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

फेब्रुवारी मार्च-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल नुकताच मंगळवार दिनांक २१ मे रोजी जाहीर करण्यात आला. या मध्ये पाटोदा शहरातील दिक्षा अनिल जावळे हिने छत्रपती शाहू महाराज विद्यालय लातूर येथून कला शाखेमध्ये ९२.३३% गुण घेत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तिने मिळवलेल्या या उज्वल यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थाचालक, संचालक, प्राध्यापक वर्ग आणि त्याच्या आई-वडील यांच्या सह मित्र परिवारांनी तिचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थीदशेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जाणारा इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच मंगळवार दिनांक २१ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. या परीक्षेत छत्रपती शाहू महाराज विद्यालयचा निकाल शंभर टक्के लागला असून या मध्ये शांत, संयमी आणि हुशार अशी ओळख असलेल्या दिक्षा अनिल जावळे यांनी कला शाखेतून ९२.३३% गुण घेऊन यश संपादन करत द्वितीय क्रमांक मिळवला. दिक्षा हि लहानपणापासून जिद्दी आणि मेहनती विद्यार्थीनी आहे. तिने जिद्दीने आणि अगदी मन लावून अभ्यास केला व १२ वी च्या परीक्षेत यश मिळविले आहे. या मिळालेल्या घवघवीत यशात तिने आपल्या आई-वडिलांसह छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक यांचा मोठा वाटा असल्याचे सागितले.



नॅशनल बोर्ड ऑफ वोकेशनल ट्रेनिंग एज्युकेशन- नवी दिल्ली
(मान्यता प्राप्त)
NATIONAL BOARD OF VOCATIONAL TRAINING EDUCATION
NBVTE
एन.बी.व्ही.टी.ई.
कौशल्यम् बलम्
विश्व फाऊंडेशन संचलित
स्व. बी. के मुंढे पॅरामेडिकल अँन्ड टेक्निकल इन्स्टिट्यूट
प्रथमच आपल्या शहरात पॅरा-मेडिकल कॉलेज
शंभर टक्के नोकरीची हमी
ADMISSION OPEN
खालील कोर्सेस साठी प्रवेश देणे सुरू आहे

| कोर्सेस | कालावधी |
|---|---|
| Diploma in X-ray Technician | कालावधी १ वर्ष पात्रता १०/१२ वी पास |
| Diploma in Dialysis Technician | कालावधी १ वर्ष पात्रता १०/१२ वी पास |
| D.M.L.T (Diploma in medical lab technician) | कालावधी १ वर्ष पात्रता १०/१२ वी पास |
| OT Technician | कालावधी १ वर्ष पात्रता १०/१२ वी पास |
| Diploma in Nursing | कालावधी १ वर्ष पात्रता १०/१२ वी पास |



सेंटरची वैशिष्ट्ये
❊ तज्ञ व अनुभवी प्रशिक्षक
❊ उच्च शिक्षण दर्जा
❊ प्रात्यक्षितासाठी (प्रॅक्टिकल)सुसज्ज लॅब व प्रशस्त ग्रंथालय
❊ ऑनलाईन व ऑफलाईन क्लासेसची सुविधा
-❊संचालक❊-
संदीप चौधरी सर Mo. 9156907326
ज्ञानेश्वर बुधवत Mo. 9960209149
ज्ञानेश्वर मुंढे Mo.7499615933
पॅरामेडिकल ची तब्बल ४० कोर्सेस उपलब्ध
मुंबई-नागपुर हायवे,साई कॉम्प्युटर जवळ सिंदखेड राजा ता.सि.राजा जि.बुलढाणा

संपादकीय

# 'मसालेदार' महाराष्ट्र

महाराष्ट्रातून होणाऱ्या निर्यातीची जी चर्चा होते, त्यात मसाल्याच्या पदार्थांचा उल्लेख तसा क्वचितच होतो. प्रत्यक्षात मसाल्याच्या पदार्थांच्या संदर्भात भारतातील निर्यात केंद्र बनण्याची क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राकडे अधिक आहे, हे लक्षात घ्यायला हवे. महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रामध्ये हे पदार्थ महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. राज्याच्या अर्थव्यवस्थेत आणि स्वयंपाकाच्या सांस्कृतिक वारशातही त्यांचे मोठे योगदान आहे; गरज आहे ती याकडे गांभीर्याने पाहण्याची.महाराष्ट्रात हळद, लसूण, मिरची, कोकम, चिंच, धने आणि मसाल्याच्या इतरही काही जिनसांचे उत्पादन होते. अनुकूल हवामान, परिस्थिती आणि मसाल्याच्या लागवडीसाठी अनुकूल कृषी-पर्यावरणीय क्षेत्रामुळे, भारतातील सर्वोच्च मसाला उत्पादकांत महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे. महाराष्ट्रात मसाल्याच्या पदार्थांच्या पिकांखालील क्षेत्र १.६२ लाख हेक्टर इतके आहे. राज्यातील मसाल्याच्या पदार्थांचे उत्पादन अंदाजे १४ लाख मेट्रिक टन इतके आहे. हळद, लसूण आणि मिरची हे राज्यामध्ये लागवड होत असलेल्या मसाला जिनसांपैकी प्रमुख आहेत, ज्यांचे उत्पादन लक्षणीय आहे. याव्यतिरिक्त कोकम, चिंच, धने आणि इतर विशेष मसाल्यांसाठीही महाराष्ट्राचा लौकिक आहे. मसाला जिनसांचे उत्पादन महाराष्ट्रातील विविध प्रदेशांमध्ये होते. उदाहरणार्थ, विदर्भात हळद, मिरची, मिरी, आले, धने यांचे उत्पादन होते. उत्तर महाराष्ट्रात हळद, आले, मिरची, लसूण आणि मराठवाड्यात हळद आणि मिरची. पश्चिम महाराष्ट्रात मिरची, हळद, आले यांचे उत्पादन होते. कोकणात मिरी, लवंग, दालचिनी, जायफळ, कोकम होते. अलीकडच्या काही वर्षांत देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत महाराष्ट्रातील मसाला जिनसांची मागणी वाढत आहे. तथापि, या मागणीचा फायदा घेऊन व्यापारात वृद्धी करायची असेल तर निर्यात क्षमता लक्षात घेऊन एक धोरणात्मक दृष्टिकोन अंगीकारणे आवश्यक आहे.निर्यात क्षमतेच्या मूल्यांकनामध्ये बाजाराची क्षमता ओळखणे, मागणीचे विश्लेषण करणे आणि जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकतेचे मूल्यांकन करणे यांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या निर्यातीचा कल लक्षात घेतला तर पश्चिम, आग्नेय आशिया, युरोप आणि उत्तर अमेरिका या भागांमध्ये निर्यात अधिक होत असल्याचे लक्षात येते. केवळ अन्नपदार्थांमध्ये वापरण्यासाठी नव्हे तर, औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांच्या निर्मितीमध्येही या मसाल्याच्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सेंद्रिय आणि टिकाऊ मसाल्यांना प्राधान्य दिले जाते. नैसर्गिक मसाल्याच्या पदार्थांच्या वापरांचा आरोग्याच्या दृष्टीने होणारा फायदाही अलीकडे या व्यापाराच्या वृद्धीला सहायभूत होत आहे. गुणवत्ता, चव आणि सुगंध या बाबतीत महाराष्ट्रातील मसाले जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत अव्वल ठरत आहेत. तथापि, पुरवठ्यात सातत्य नसणे, पायभूत सुविधांची वानवा आणि अनेकविध नियमांचे अडथळे हे या जागतिक पातळीवरील निर्यात वाढीतील प्रमुख अडथळे आहेत.महाराष्ट्रातील मसाल्याच्या काही पदार्थांना जीआय टॅगही प्राप्त झालेला आहे. उदाहरणार्थ सांगली, वायगाव आणि वसमत येथील हळद, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गचे कोकम, लातूरची चिंच, नंदुरबारची व कोल्हापुरी मिरची आणि काष्टीची कोथिंबीर. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय बाजारात आपली नाममुद्रा उमटवण्याची आणि चांगला पैसा मिळवण्याची ही संधी आहे. धाराशिव आणि सांगलीसारख्या मोक्याच्या ठिकाणी 'स्पाइस बोर्डा'ची कार्यालये स्थापन केल्याने बाजारपेठेतील प्रवेश सुलभ होऊन व्यापार प्रोत्साहन आणि क्षमता निर्माण उपक्रम सुलभ होऊ शकतात. उच्च-गुणवत्तेच्या, मसाल्याच्या पदार्थांचा एक अग्रगण्य पुरवठादार म्हणून राज्याचे स्थान निर्माण होऊ शकते.यातील प्रमुख आव्हानांचाही त्यासाठी विचार होणे गरजेचे आहे. अपुऱ्या कोल्ड स्टोरेज सुविधा, वाहतुकीचे जाळे आणि प्रक्रिया युनिटसह पायाभूत सुविधांबाबतच्या अडचणी यातून मार्ग काढता आला तरच निर्यात वाढू शकते. निर्यातीचा नेमका आकार काय आहे, त्याची माहिती देणे, गुणवत्तेच्या मानांकनाचे पालन होणे, स्वच्छतेचे निकष पाळले जाणे याकडे लक्ष दिले गेले तर व्यापार अधिक सुलभ होईल. जगाच्या स्पर्धेत राहायचे असेल तर बदलत्या परिस्थितीकडे सतत लक्ष ठेवून असणे आणि वेळोवेळी धोरणांचा फेरविचार करणे, त्यात बदल करणेही गरजेचे आहे. धाराशिव आणि सांगली येथील स्पाइस बोर्डाची प्रस्तावित कार्यालये निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या कार्यात आणि निर्यातीत समन्वय साधण्यासाठी शेतकरी आणि निर्यातदारांना तांत्रिक सहाय्य प्रदान करण्यासाठी आणि बाजारपेठेतील संबंध सुलभ करण्यासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करू शकतील.मसाल्याच्या पदार्थांच्या उत्पादनापासून ते पुढील प्रक्रिया तसेच त्याचे योग्य मार्केटिंग करायचे झाले तर शेतकऱ्यांनी एकत्र येणे, एकमेकांना सहकार्य करणे गरजेचे आहे. योग्य उत्पादन पद्धती, लागवडीच्या पातळीवरील मार्गदर्शन, व्यवस्थापन झाले पाहिजे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विक्रीला पाठवायची झाली तर ही पिके कशी हाताळावी, दर्जाचे नियंत्रण कसे करावे, गुणवत्ता कशी राखावी याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देणे गरजेचे आहे. सेंद्रिय शेतीचे महत्त्वही त्यांना पटवून देणे आवश्यक आहे. या पदार्थांचे संशोधन, इतर काही मसाल्याच्या पदार्थांचे उत्पादन महाराष्ट्रात घेण्याची शक्यता, या पदार्थांचा वापर करून आणखी काही नवी उत्पादने बाजारात आणता येतील का, याची चाचपणी यातून या निर्यातीचा अधिक विस्तार होऊ शकेल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार मेळे, प्रदर्शने आणि या मसाल्यांना प्रसिद्धी मिळावी यासाठीचे अन्य प्रयत्न होण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील मसाल्याच्या पदार्थांची निर्यात वाढवण्यासाठी सोशल मीडिया, ई-व्यापार, डिजिटल मार्केटिंग यांचा वापर सध्या जवळपास शून्य आहे. 'जो दिखता है, वो बिकता है' हे लक्षात घेऊन या मसाल्याच्या पदार्थांच्या व्हिज्युअल प्रमोशन होण्याचीही गरज आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये मसाला निर्यात क्लस्टर्सची स्थापना करण्यात आली तर हे होऊ शकते.या संबंधीची जबाबदारी निश्चित करून एक कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज आहे. त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद आणि या सर्व व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी यंत्रणा निर्माण व्हायला हवी. महाराष्ट्राची मसाल्याच्या पदार्थांची निर्यात क्षमता ओळखणारे योग्य धोरण, पायाभूत सुविधांचा विकास, बाजारपेठेतील प्रवेश सुविधा आणि क्षमता वाढवणारे उपक्रम यांचा समावेश असलेल्या बहुआयामी दृष्टिकोनाची आवश्यकता त्यासाठी आहे. मसाल्याच्या पदार्थांमधील वैविध्य, भौगोलिकतेचा फायदा आणि अन्नपदार्थांमधील वापराच्या सांस्कृतिक वारशाचा लाभ घेऊन, जागतिक मसाल्यांच्या व्यापारात महाराष्ट्र एक अग्रगण्य खेळाडू म्हणून उदयास येऊ शकतो. त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकेल, ग्रामीण विकासाला चालना मिळू शकेल आणि राज्याच्या आर्थिक वाढीसही हातभार लागेल. पारंपरिक पिकांवरील अवलंबित्व कमी झाले तर त्यातून शेतकऱ्यांचे जीवनमानही बदलण्याची क्षमता मसाल्याच्या पदार्थांच्या निर्यातीत आहे, गरज आहे ती ही क्षमता ओळखण्याची.

# सत्रिय

नृत्ययात्रा

**लोकनेता न्युज नेटवर्क**

सत्रिय नृत्य हे एक प्रमुख भारतीय शास्त्रीय नृत्य आहे.हे सुरुवातीला भावनांचा एक भाग म्हणून तयार केले गेले होते जे अंकिया नाट एकांकिका नाटके आहेत. मुळत: शंकरदेव आसाममधील १५ व्या १६ व्या शतकातील बहुप्रतिक. सत्रीय जिवंत परंपराचा भाग आहेत . शंकरदेव यांनी स्थापन केलेल्या एकासरन धर्मातील जिवंत भक्तांचे समूदाय आहेत. खेळलेल्या थीम कृष्णाशी संबंधित आहेत.तसेच विष्णूचे इतर अवतार जसे की राम, महाभारत आणि रामायण या महाकाव्यातील कथा.

१५ नोव्हेंबर २०००रोजी ,भारताच्या संगीत नाटक अकादमी ने सत्रियला भारतातील आठ शास्त्रीय नृत्यापैकी एक म्हणून मान्यता दिली. मॉर्डन सत्रिय अनेक थीम आणि नाटकाचा शोध घेत आणि त्याचे सादरीकरण जगभरात केले जाते.

सत्त्रियाच्या आधुनिक स्वरूपाचे श्रेय १५ व्या शतकातील शंकरदेवाला दिले जाते,ज्याने प्राचीन ग्रंथाचा वापर करून नृत्याची पद्धतशीरपणे रचना केली आणि कृष्णाच्या भावनिक भक्तीसाठी सामुदायिक धार्मिक कलेचा एक प्रकार म्हणून नाटक आणि अभिव्यक्त नृत्य सादर केले.

१५ व्या शतकापासून ,सत्र नावाच्या हिंदू मठामध्ये वैष्णव भक्ती चळवळीचा एक भाग म्हणून सात्रिय कला वाढली.ही कला भिक्षूंनी कृष्णाच्या दंतकथा आणि पौराणिक कथांवरील नृत्य नाटकांच्या स्वरूपात विकसित आणि सराव केली होती, विशेषतः भागवत पुराण सारख्या ग्रंथांमधून मंदिरे आणि मठामधील सत्रीय नृत्याचा एक विशिष्ट्य भाग असा आहे की हे नृत्य कोणत्याही मूर्तीसमोर साजरे केले जात नाही.परंतु हॉलच्या मनिकुट को पर्यंत ठेवलेल्या भागवत पुराणाच्या प्रतीच्या आधी केले जाते.

पोशाख : सत्तरिय नृत्याचा पोशाख प्रामुख्याने दोन प्रकारचा असतो.पुरुष पोशाख ज्यात धोतर ,चादर आणि पागुरी (पगडी) आणि महिला पोशाख ज्यात घुरी ,चादर आणि कांची (कंबरेचे कापड ) असतात.पारंपरिकपणे कपडे पांढऱ्या किंवा कच्चा रेशीम रंगाचे होते आणि विशिष्ट्य नृत्य क्रमांकासाठी लाल ,निळा आणि पिवळा वापरला जात असे.पूर्वीच्या काळी मखमली आणि साटन चे साहित्य बहुतेक कपड्यांसाठी वापरले जायचे.काळाच्या बदलानुसार ,हा नृत्य प्रकार सत्तरातून रंगमंचावर विकसित होत गेला ,तसतसे नृत्याचा कपड्यांचे डिजाइन आणि साहित्य बदलत गेले. पॅट, आसाम मध्ये तयार होणारे रेशीम जे तूतीच्या वनस्पतीपासून घेतले जाते आणि मुगा रेशीम देखील नृत्य ड्रेस तयार करण्यासाठी वापरले जाते.महिलांच्या कपड्यांमध्ये ही इतर चमकदार रंग वापरले जातात.या हाताने विणलेल्या साहित्यात सामान्यतः
किंगखाप,मिरी मोटीफ,कोलका इ.स्थानिक आकृतीबंध असतात.

सत्तरीय नृत्यातही खेळ - विशिष्ट्य पेहरवाचा वापर दिसून येतो.कृष्ण नृत्य आणि नादूभंगी नृत्याचा पोशाख पिवळ्या आणि निळ्या रंगाचा आहे जो भगवान कृष्णाच्या पोषाखाला अनुरूप आहे. सूत्रधार नृत्यातही विशिष्ट्य पगडी असलेला पांढरा पोशाख असतो.

दागिने : सत्तरीय नृत्यात पारंपरिक आसामी दागिने वापरतात.केसा सन (कच्चे सोने) मध्ये एका अनोख्या तंत्राने दागिने बनवले जातात. कलाकार कपाळावर कोपली ,मुठी खारू आणि गम खारू (बांगड्या) माता सोनी (पुरुष नर्तकासाठी )गोलपाटा,
धुलबिरी,(वाद्य वाद्य ढोल सारखा आकार) बेना (चंद्र कोराच्या आकाराचे लटकन ) असे विविध प्रकारचे गळ्याचे तुकडे घालतात. जेठीपाटा (सडर्याच्या आकाराचा) दुग्डगदी (पानाच्या आकाराचा) सेनपाटा (गरुडाच्या आकाराचा) धनसिरा (तांदळाच्या दाण्यांचा कट्टा) आणि लोकापारो (कबुतराची रचना) कानातले सामान डिझाईन्स मध्ये बनवले जातात आणि थुका सूना आणि केरू देखील नर्तक परिधान करतात.महिला



नर्तक केसांमध्ये पांढरी फुले घालतात.

संगीत वाद्ये : खोल (बोटांनी वाजवले जाणारे) झांजा,मंजिरा, भोरताल , बिहुताल,पतीताल, खुटीताल )आणि बासरी ,व्हायोलिन आणि हार्मोनियम इ वाद्ये वाजवतात.अश्या प्रकारे आपण आतापर्यंत भारतीय शास्त्रीय नृत्य मधील एकूण आठ नृत्य प्रकाराची माहिती घेतली.भेटूया पुढील भागात....भारतीय लोकनृत्य हा प्रकार घेऊन ....

**डॉ. रेणू जोशी**
**अभिनेत्री,नृत्यदिग्दर्शक**

# स्व.हरिदासजी सोनवाल-कृष्णाजी अवधूत संस्थान सावंगा विठोबाचे एक आदर्श विश्वस्त

**लोकनेता न्युज नेटवर्क**

अवधूत संप्रदायाचे प्रवर्तक कृष्णाजी महाराजांनी सावंगा विठोबामध्ये वास्तव्य केले.तेथे असलेली त्यांची समाधी हे या गावातील व अमरावती जिल्ह्यातील आकर्षण आहे.समाधीच्या ठिकाणी बांधलेले मंदिर हे जुन्या वास्तू शिल्पाचे उत्तम उदाहरण आहे.या मंदिरामध्ये दरवर्षी गुढी पाडवा व विजयादशमी ला फार मोठ्या प्रमाणात भक्तगण येतात व आज त्याला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यामध्ये वसलेले सावंगा विठोबा आज श्री क्षेत्र सावंगा विठोबा म्हणून ओळखले जाते ते कृष्णाजी महाराज यांची असलेली समाधी व अवधूत संप्रदायामुळे.विदर्भातील पंढरपूर म्हणूनही सावंगा विठोबा या गावाला ख्याती प्राप्त झाली आहे.

अशा या कृष्णाजी अवधूत संस्थान,सावंगा विठोबाचे अवधूत संप्रदायाचे प्रचारक स्व.हरिदासजी बाबूसा सोनवाल हे २३ वर्षे विश्वस्त होते. अचलपूर या ऐतिहासिक नगरीतील एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे स्व.हरिदासजी बाबुसा सोनवाल २०२४ च्या १३ मे या दिवशी अनंतात विलिन झाले. सोनवाल परिवारासोबतच सर्व आप्तस्वकीयांना,अचलपूर नगरवाशीयांना,सावंगा विठोबा नगरवाशी व अवधुत संपद्रायातील हजारो भक्तांना दुःख सागरात बुडवून गेले.आज २०२४ च्या २३ मे गुरुवारला तेरवी निमित्त त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाविषयी हा शब्दप्रपंच.

स्व.बाबूसा व स्व.सिताबाई यांच्या पोटी १९३० च्या डिसेंबर मासातील २९ तारखेला एक गोंडस बाळ जन्मास आलं.त्याचे नाव ठेवण्यात आले हरिदास.

बाबुसा वडील ।
सिताबाई माता ।।
सुसंस्कार दाता
मातापिता ।। आई-वडिलांच्या सुसंस्कारातून हरिदासाचे बालपण घडत गेले.

अवधूत संप्रदायातील त्यांच्या आई-वडिलांना हरिनामाची व अवधूत भजनाची फार मोठी आवड होती.हरिदासही बालपणापासूनच हरिनाम व अवधुती भजनात रमू लागले व सोबतच समाजसेवाही करू लागले कारण त्यांच्यावर आई-वडिलांनी केलेल्या सुसंस्कारामुळे ते बालपणापासून सज्जनांच्या संगतीत राहू लागले.

धरा सज्जनांची संगत ।।
सोडा दुर्जनांची सोबत ।।
आदर्शाचं माहेरहेर ।।
जीवन होईल तुमचं ।। अशाप्रकारे बालपणातील सज्जनांच्या संगतीचा उपयोग त्यांना पुढे पोलीस खात्यात सेवाकार्य करताना फार मोठ्या प्रमाणात झाला.

सन १९५४ मध्ये स्व. हरिदासजी सोनवाल यांची पोलीस दलात नियुक्ती झाली. तेव्हापासूनच त्यांनी समाजाला गुन्हेगारांपासून वाचवण्यासाठी प्रयत्न केले कारण समाजसेवेचे आई - वडिलांचे सुसंस्कार त्यांच्यावर बालपणीच झाले होते. पोलीस दलात भरती झाल्यावर त्यांनी एकाच गावात सेवाकार्य न करता सिटी कोतवाली व राजापेठ अमरावती,शिरखेड, परतवाडा,आसेगाव या ठिकाणी सेवाकार्य करून ते ग्राम गुन्हेगारी मुक्त करण्याचा प्रयास त्यांनी केला.विशेष म्हणजे अमरावती येथे सेवाकार्य करीत असताना अमरावती ते अचलपूर हा ५० किलोमीटरचा प्रवास त्यांनी अनेक वेळा सायकलने केला व निरोगी आरोग्य जगले.

पोलीस दलात नोकरी करताना ते शांत बसले नाहीत तर अनेक अवघड गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना योग्य त्या शिक्षेपर्यंत पोहोचवून समाजामध्ये तसे गुन्हे कोणी करणार नाही अशी गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण केली व समाजाला गुन्हेगारीपासून वाचविण्याचा प्रयास सतत केला कारण ते म्हणत,

माणसाने माणुसकीने,
वागावे हे खरे ।।
निर्माण होतील मग,
प्रेमाचेच झरे ।।

त्यांच्या अंतःकरणात असलेल्या प्रेमाच्या झऱ्यामुळेच ते गोरगरिबांना सतत मदत करीत कारण गोरगरिबांची सेवा हीच ईशसेवा अशी त्यांची धारणा होती.त्यांनी फक्त समाजसेवाच केले नाही तर स्व.हरिभाऊ सोनवाल यांनी आपल्या चारही मुला-मुलींना सुसंस्कार देऊन घडविले.आज त्यांचे थोरले सुपुत्र श्री अशोकराव हे अमरावती आयुक्तालयातून सहा.पोलीस निरीक्षक (-.झ.ख.) पदावरून
२०१० ला सेवानिवृत्त झाले.त्यांचे धाकटे सुपुत्र श्री सतीशराव हे अमरावतीला व्यवसायिक आहेत.त्यांच्या सुकन्या सौ.सुनंदा रघुनाथराव अजमिरे व सौ.अल्का वसंतराव गोडबोले या त्यांच्या वडिलांचा वारसा जपत आहेत. स्व.हरि दासजींचे नातू श्री अमोल अशोकराव सोनवाल व श्री सारंग सतीशराव सोनवाल हे इंजिनिअर असून श्री मयूर अशोकराव सोनवाल अमरावतीच्या बँक ऑफ इंडिया मध्ये कार्यरत आहे.श्री ऐश्वर्य सतीशराव सोनवाल अमरावतीला व्यवसायिक आहे.सौ.अर्चना व सौ.सरिता या दोन्ही स्नुषा आणि सौ.मीनल,सौ.स्नेहा व सौ. मोनिका या नात स्नुषा स्व. हरिभाऊंच्या आदर्शाचा पाठ आचरणात आणून सोनवाल कुटुंबाच्या रोपट्याचे त्यांनी वटवृक्षात रूपांतर केलेले आहे.

स्व.हरिदासजी सोनवाल हे स्पष्टवक्ते व सत्यवादी होते. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे व सत्यवाणीमुळे त्यांना कर्तव्यावर सेवाकार्य करताना खूप अडचणी येत होत्या पण त्यातून ते योग्य मार्ग काढून सेवाकार्य करीत असत.त्यांच्या या सद्गुणांची त्यांच्यासोबत असलेल्या सेवेकरी मित्रांनाही कधी कधी भीती वाटत असे.

स्व.हरिदासजी सोनवाल यांनी १९८८ मध्ये स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आणि सेवानिवृत्तीनंतर श्री कृष्णाजी संस्थान,सावंगा विठोबा जिल्हा अमरावती या ठिकाणी १९९५ ते २०१३ पर्यंत ते अठरा वर्षे विश्वस्त या पदावर कार्यरत होते.पुढे २०१४ पासून २०१८ पर्यंत उपाध्यक्ष म्हणून कार्य केले. आणि पुढे २०१९ ते २०२४ पर्यंत पुन्हा पाच वर्षे विश्वस्त या पदावर कार्यरत होते.कृष्णाजी अवधूत संस्थान सावंगा विठोबाचे २३ वर्षे विश्वस्त असताना त्यांचा प्रामाणिकपणा निःस्वार्थीपणा आणि मनोभावे सेवाभाव या गुणामुळे विश्वस्त या पदाचे महत्त्व काय असते हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे व बोधप्रद होते. त्यामुळेच त्यांच्यापासून विश्वस्त पदावरील सेवा करण्याची अनेकांनी प्रेरणा घेतली. स्व.हरिदासजी अवधूत संप्रदायातील चतुरपती नामाचे विचारवंत व नामाचा अभ्यास असलेले ते गाढे अभ्यासक होते. आज त्यांचे सुपुत्र माजी ए.पी. आय. श्री अशोकराव सोनवाल या संस्थांनचे मार्च २०२४ पासून सचिव पदी कार्यरत आहेत.ते सुद्धा आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून श्री क्षेत्र सावंगा विठोबा संस्थानचे मनस्वी सेवाकार्य करीत आहेत. स्व.हरिदासजी सोनवाल यांनी सावंगा विठोबा संस्थानमध्ये अवधुती भजन व नामस्मरण सुरू राहावे यासाठी अनेक भक्तांना एकत्र करून मांडीचे कार्यक्रम आयोजित केले कारण नामस्मरणामध्ये असणाऱ्या शक्तीची त्यांना कल्पना होती. त्यांनी सावंगा विठोबा संस्थानच्या विकासासाठी विश्वस्त - उपाध्यक्ष असताना रात्रंदिवस परिश्रम घेतले.ते कुशल संघटक असल्यामुळे त्यांना अनेक भक्त मिळाले.सर्व भक्तांसोबत त्यांचे प्रेमळ नाते होते.स्पष्टवक्तेपणा व सत्यप्रिय व्यक्ती म्हणून ते प्रसिद्ध होते.असे प्रभावी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या स्व.हरिदास बाबुसा सोनवाल यांच्या आज असलेल्या तेरवी निमित्त मी त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाला विनम्र आदरांजली अर्पण करतो .

तेरवी निमित्त ।
हरिदासजींना ।।
करितो वंदना ।
कोटी कोटी ।।

**महानुभाव ग्रंथोत्तेजक साहित्य**
**अलंकार पुरस्कार प्राप्त साहित्यिक**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर,अमरावती.**

# वंजारी महासंघाच्या वतीने दुसऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

## अहिल्यानगर येथे होणार दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**अहिल्यानगर। प्रतिनिधी**

वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य अघाडी आयोजित वंजारी समाजाचे पाहिले राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन नाशिक येथे डिसेंबर २०२२ मध्ये पार पडले होते. त्याच वेळी वंजारी समाजातील वैचारिक पोकळी भरून निघावी म्हणून द्विवार्षिक संमेलन अंखडीतपणे परंपरा म्हणून घेण्याचा निर्णय झाला होता. त्या अनुषंगाने २०२४ मध्ये संमेलन होण आवश्यक आहे त्यामुळे अहिल्या नगर येथे सन २०२४ चे वंजारी समाजाचे दुसरे एकदिवसीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार असून यजमान म्हणून संपुर्ण वंजारी समाज अहिल्या नगर जिल्हा असेल, त्याच प्रमाणे या संमेलनासाठी स्वागत अध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार लक्ष्मण आघाव पाटील हे असतील तर अयोजक म्हणून अहिल्या नगर वंजारी महासंघ जिल्हा शाखा असल्याने जिल्हा अध्यक्ष मल्हारी खेडकर सर व महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रेणुकाताई वराडे (सानप) असतील त्यासोबतच लवकरच उर्वरित स्वागत अध्यक्ष समिती घोषित करण्यात येईल व सोबतच अयोजन समिती सदस्य यांची देखील निवड करण्यात येईल. पाहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष खानदेशरत्न साहित्य सम्राट प्रा वा ना आंधळे सर हे लवकरच आपला कार्यभार देऊन दुसरे संमेलनाध्यक्ष यांची निवड घोषित करतील. सन माहे डिसेंबर २०२२ मध्ये रावसाहेब थोरात सभागृह नशिक येथे वंजारी समाजाचे पाहिले राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. हिच परंपरा अखंडीतपणे पुढे चालवली पाहिजे या अनुषंगाने विचार विनिमय करुन द्विवार्षिक संमेलन अंखडीतपणे घेण्याची परंपरा राखली जावी आणि प्रत्येक वेळी आयोजनाची संधी हि वेगवेगळ्या जिल्ह्याला असावी, सगळ्या जिल्ह्यांची संधी पुर्ण झाल्यावर पुन्हा मुळं त्या जिल्ह्याला संधी मिळेल अशा पद्धतीने आयोजन करण्यात येईल आणि याचा पुढील अंक म्हणून माहे सप्टेंबर ऑक्टोबर २०२४ मध्ये अहिल्या नगर या ठिकाणी संमेलन आयोजित करण्यात येईल. त्याच अनुषंगाने







नुकतेच वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक व विचारवंत साहित्यिक लेखक आध्यत्मिक मार्गदर्शक गणेश खाडे यांनी अहिल्या नगर येथील महिला जिल्हाध्यक्षा रेणुकाताई वराडे सानप यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीस उपस्थित राहून संमेलना बाबत मार्गदर्शन केले. या वेळी अंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार लक्ष्मण आघाव व अहिल्या नगरचे जिल्हाध्यक्ष मल्हारी खेडकर सर त्या सोबतच अहिल्या नगर येथील मान्यवर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संमेलनाचे भव्य दिव्य अयोजन करण्याबाबत लवकरच बैठक घेऊन समिती गठित करण्यात येईल आणि राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळींना उपस्थित राहण्या बाबातचे निमंत्रण व ऐतिहासिक आयोजन करण्याबाबत लवकरच वेगवेगळ्या पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून नियोजन करण्यात येईल तसेच संमेलन ऐतिहासिक कसं होईल यासाठी समर्पित भावनेने योगदान देण्याची भुमिका स्वागताध्यक्ष आतंरराष्ट्रीय अनेक पारितोषिके विजेते कुस्ती पटू राजकुमार आघाव आयोजक मल्हारी खेडकर रेणुकाताई वराडे सानप यांनी केले आहे.

समाज बंधू भगिनींनो,सविनय नमस्कार.व वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याने विविध आघाड्यांच्या माध्यमातून समाज कामी आजवर केलेले कार्य सर्वश्रुत आहे. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री.गणेशजी खाडे व संचालक मंडळ यांच्या या महत्कार्याला समाजातले सहृदयी कदापी विसरणार नाहीत.द्वितीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन येत्या नोव्हेंबर २०२४ ला अहिल्यानगर येथे संपन्न होत असून समाजातल्या लेखक कवींना हक्काचे व्यासपीठ यानिमित्ताने मिळत असल्याचा मला मनस्वी आनंद आहे. बंधू भगिनींनो नाशिक येथे २०२२ मध्ये संपन्न झालेले महासंघाचे पहिले राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या संमेलनाचे अध्यक्षस्थान मला देऊन जो विश्वास महासंघाने माझ्यावर दाखवला. मी महासंघाचे व सर्व समाज बंधू भगिनी साहित्यिक व श्रोते यांच्या विषयी मनस्वी ऋण व्यक्त करतो , मनापासून धन्यवाद देतो. द्वितीय संमेलन त्याच उत्साहाने आपणा सर्वांच्या सहकार्याने संपन्न व समृद्ध करावयाचे आहे. यासाठी समाज बंधू भगिनींनी सर्वोतोपरी सहकार्य करावे. राष्ट्रसंत भगवान बाबांचा हा रथ यशाच्या दिशेने नेण्यासाठी सारे एकत्र येऊ या. समाजाला भरीव ओळख देऊ या.

## राष्ट्रीय महामार्ग बनले मृत्युचे सापळे

# अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील भेगा,अपघातास निमंत्रण ; नितीनजी गडकरी यांना तक्रार-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यातुन जाणारे राष्ट्रीय महामार्ग वाहनचालकांच्या मृत्युचे सापळे बनले असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा दरम्यान येळंब घाट याठिकाणी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जागोजागी भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे चाक फसुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे यात अनेकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे तर काही जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावरील खड्डे ,तडे आणि भेगा अपघातास निमंत्रण देत आहे . संबंधित काम एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनीकडून करण्यात आले असुन सततच्या अपघातांमुळे राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचा सापळा बनला असुन जबाबदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे. पडलेल्या भेगांची थातुरमातुर दुरुस्ती न करता ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी याप्रकरणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे आणि जिल्हा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. संबंधित प्रकरणात जबाबदार कंत्राटदार व प्रशासकीय आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार



कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत नितीनजी गडकरी, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यकारी अभियंता मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी या मार्गाचे काम कालावधी पूर्ण होऊनही गेल्या ६ वर्षांपासून अद्याप रखडलेल्या अवस्थेत आहे. एकुण १७० किलोमीटर लांबी असलेल्या महामार्गाची एकुण किंमत ८७९ कोटी रुपये आहे.राष्ट्रीय महामार्ग विभागाने ठेकेदारांच्या हितासाठी सदर रस्त्याचे तीन टप्पे करून तिन वेगवेगळ्या कंपन्यांना काम दिलेले आहे. अर्धवट रस्ता, खड्डे आणि पुर्ण झालेल्या कामाच्या ठिकाणी पुन्हा खड्डे पडले आहेत.चुंबळी फाटा ते मांजरसुंभा १६६ कोटी रूपयांचे काम (एचसीपीएल) ; मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा ३९५ कोटी रूपयांचे काम (एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनी) आणि धायगुडा पिंपळा ते




अहमदपूर ३१८ कोटी रूपयांचे काम ( सत्यसाईबाबा कंपनी लातुर) यांच्या मार्फत करण्यात येत आहे. बहुतांश कामे अंदाजपत्रकाला फाटा देऊन संथगतीने कामे केल्याने रखडलेल्या अवस्थेत आहेत. कामे पूर्ण होण्यापूर्वीच जागोजागी रस्ते उखडले आहेत, खड्डे,भेगा पडलेल्या आहेत.आणि दुरुस्तीची कामे थातुरमातुर करण्यात येत असुन पडलेल्या भेगा डांबर टाकून बुजवण्याचे प्रकार करण्यात येत आहेत. कंत्राटदार यांच्यावर राष्ट्रीय महाप्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन मेहेरबान असल्याने रस्त्यांची दुरावस्था झाली आहे.महामार्गाचे काम सुरू होऊन ६ वर्षांपेक्षा कालावधी लोटला असुन अद्याप काही ठिकाणी दोन रस्त्यांमधील दुभाजक,अपुर्णच आहे काही ठिकाणी पुलांचे तर बहुतांश ठिकाणी नाल्यांची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत तसेच सुरू कामाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक,बरीकेट्स लावण्यात आलेली नाहीत त्यामुळे अपघातांच्या घटनेत वाढ झाली आहे त्यामुळे कासवगतीने चालणारे काम एचपीएम कंपनीने तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण आणि विस्तारीकरण करताना ४०-५० वर्षापुर्वीची वड,पिंपळ, कडुनिंब या वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. नियमानुसार तोडण्यात आलेल्या वृक्षाच्या ५ पट झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावणे बंधनकारक असताना मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीने सुरूवातीला काही ठिकाणी वृक्षलागवड केल्याचे नाटक फोटो सेशन करण्यापुरतेच केले परंतु त्याचे संगोपन करण्यात आले नसुन सध्या एकही झाड अस्तित्वात दिसत नाही.मात्र वृक्षलागवड, वृक्ष संगोपन आणि उन्हाळ्यात टँकरने पाणी दिल्याची बिले मात्र नियमित उचलण्यात आल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे याठिकाणी वृक्षांची लागवड आणि संगोपण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# मराठा,धनगर,माळी,रामोशी इत्यादी बहुजन समाज आमचा धम्म बांधवच-साठे प्रबुद्ध

## बुद्ध जयंती व बौद्ध पौर्णिमा भारतीयांनी घरावर गुड्या उभारुन साजरी करावी- साठे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



बहुजन समाज पूर्वाश्रमीचा बौध्दच असून बौद्ध धम्म हीच त्यांची खरी ओळख असून,हिंदू म्हणून घेणारा मराठा,माळी,धनगर,रामोशी, होलार इत्यादी बहुजन समाज आमचा धम्म बांधवच असे सत्य भाष्य चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियानाचे प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले, ते सातारा जिल्ह्यातील दरूज या छोट्याशा गावात मोठ्या प्रमाणात सर्व समाजाच्या सहभागातून मोठ्या उत्साहात आयोजित केलेल्या बुद्ध जयंती व बौद्ध पौर्णिमेच्या निमित्त आपल्या धम्म प्रवचनात ते बोलत होते.प्रबुद्ध साठे आपल्या प्रबोधनात्मक भाषणात पुढे म्हणाले,बौद्ध पौर्णिमा व बुध्द जयंती भारतीयांनी घरावर गुडी उभारुन साजरी करावी, कारण भारत हा पूर्वाश्रमीचा बौध्दच असून,बौद्ध भारताची पुनर्रस्थापना करण्याची संकल्पना बुद्ध जयंती निमित्त करूया असे आवाहन करीत बहुजन बांधवांनो किती दिवस हिंदुत्वाच्या नावाखाली ब्राम्हणांची गुलामी करायची,या गुलामीतून बाहेर पडा व चला आपल्या बुध्दाच्या घरी,बौद्ध धम्म स्वीकारून मराठा,मातंग,माळी, धनगर, होलार, रामोशी, इत्यादी बहुजन समाज बांधवांनी घरवापसी करावी असे आवाहन प्रबुद्ध साठे यांनी केले,याप्रसंगी अजीत नलवडे,ड किसन खामकर,कॅप्टन आनंदराव लावंड,दादासाहेब गायकवाड, पंचशील तरुण मंडळ दरुज, सर्व पदाधिकारी व बहुजन बांधव व मोठ्या प्रमाणात महिला भगिनी उपस्थित होत्या,सूत्रसंचालन किरण गायकवाड यांनी केले.

# इंदापूरच्या तहसीलदारांवरील हल्ल्याची घटना निषेधार्थ;घटनेचा हर्षवर्धन पाटील यांच्याकडून निषेध


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

इंदापूरचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला.यामुळे मोठा गोंधळ उडाला.या घटनेचा सर्व स्तरातून निषेध करण्यात येत आहे. या घटनेची माहिती घेत राष्ट्रीय साखर संघाचे अध्यक्ष, माजी मंत्री भाजपा नेते हर्षवर्धन पाटील यांनी देखील निषेध केला आहे.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, इंदापूरच्या तहसीलदारांच्या गाडीवर आज धक्कादायक प्रकारे हल्ला करण्यात आला आहे. तसेच धक्काबुक्की करण्यात आली.ही घटना निषेधार्थ आहे.अशी घटना इंदापूरमध्ये याआधी झाली नाही.यामध्ये आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन कारवाई केली जावी,यासाठी पोलीस यंत्रणेला सूचना दिल्या आहेत.

असले प्रकार कधी खपवून घेतले जाणार नाहीत. या घटनेचा मी जाहीर निषेध करतो. सरकारी अधिकारी आपल्या परीने काम करत असतात,मात्र




अशा प्रकारे हल्ले होत असतील तर हे चुकीचं आहे, असेही ते म्हणाले.

# राष्ट्रीय पेयजल योजना व जल जीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामाची चौकशी करा-पत्रकार सचिन खंडारे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

मोठ्या प्रमाणामध्ये अधिकारी व ठेकेदार यासाठी पैसे लाटण्यासाठी योजना फायदेशीर ठरलेल्या राष्ट्रीय पेयजल योजना व जल जीवन मिशन अंतर्गत सिनखेडराजा तालुक्यामध्ये अनेक गावांमध्ये पाणीटंचाई दूर करण्याकरता कामे सुरू आहेत,यामध्ये नवीन नळ योजना नवीन पाण्यासाठी विहीर नवीन नळ व इतर कामे यामध्ये असून काही गावांमध्ये एक कोटी वीस २० हजार रुपयाची योजना आहे तर काही ठिकाणी दोन कोटी पन्नास हजाराची योजना आहे विषय असा आहे की या योजने करता शासन व केंद्र शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देत असून एवढ्या पैशांमध्ये हे कामे होऊन सुद्धा बराचसा निधी केवळ संबंधित ठेकेदार व कर्मचारी यांनी जुन्या कामावरूनच काम न करता बिल काढण्याचे अनेक प्रकार समोर आले आहे, काही ठिकाणी तर विहिरीचा इस्टिमेटनुसार काम न करता विहिरीचा स्पॉट बदलण्यात आला आहे यामध्ये तांदूळवाडी येथील स्पोर्ट बदलण्यात आला असून अशा प्रकारचा स्पॉट कोणालाही बदलता येत नाही,त्यामुळे कोट्यावधीचा निधी येत असताना संबंधित ठेकेदार व कर्मचारी यांनी संगनमताने लाखो रुपयांचा अपहार केला असल्याचे निदर्शनात येत असून सिंदखेडराजा तालुक्यामध्ये कुठल्याही प्रकारचे काम पूर्ण झाले नसून याप्रकरणी पत्रकार सचिन खंडारे यांनी आवाज उठवला असून त्यांनी दिनांक २४ मे रोजी उपविभागीय अभियंता ग्रामीण पुरवठा विभाग चिखली यांना त्यांनी निवेदन दिले असून चौकशीची मागणी केली आहे तसेच इस्टिमेट नुसार सर्वच कामाची चौकशी करून दोषी असणाऱ्यांना कठोर कारवाई करावी अशी मागणी सुद्धा त्यांनी केली आहे ,त्यामुळे लवकरच सर्व कामांची चौकशी लागणार असून यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत .



# जेव्हा चक्क पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा त्यांनी सरकारला कळवलं की,दिल्ली पर्यंत यायला पैसे नाहीत पद्मश्री पोस्टाने पाठवा साहेब

## अजब आणि अफाट आहे न हे ? मी सत्यकथा सांगतोय ओडिशातील हलधर नाग या अवलियाची..!!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

माणसाने जिद्दी राहावे ही या तून शिक्षा मिळते.दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत... पद्मश्री.... पोस्टाने पाठवा साहेब ! 'शिक्षण फक्त तिसरी पास'... ज्यांच्या नावापुढं कधीच कुणी श्री लावलं नव्हतं,ज्याच्याकडे संपत्ती म्हणून काय होते तर कपड्याचे फक्त तीन जोड, तुटलेली एक रबरी चप्पल,एक जुनाट चष्मा आणि रोख ७३२ रुपये फक्त ! त्याला जेव्हा चक्क पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा त्यांनी सरकारला कळवलं की, दिल्ली पर्यंत यायला पैसे नाहीत पद्मश्री.... पोस्टाने पाठवा साहेब ! अजब आणि अफाट आहे न हे ? मी सत्यकथा सांगतोय ओडिशातील हलधर नाग या अवलियाची.कोसली भाषेत कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी,कहर म्हणजे त्यांनी आजवर जितक्या कविता आणि वीस महाकाव्य लिहिली आहेत ते सर्व त्यांना तोंडपाठ आहे. आणि आता तर संभलपूर विश्वविद्यालयात त्यांच्या हलधर ग्रंथावली - भाग -२ याचा पाठयक्रमात समावेश करण्यात आलाय.साधाच वेष,शक्यतो पांढर धोतर,गळ्यात गमछा आणि बहुतेक वेळा अनवाणी फिरणारे हलधर एक अफलातून अवलिया आहेत.हि खरे तर इंडियन आयडॉल आहेत.पण कचकड्याच्या दुनियेतील रियालिटी शो मधल्याना आपले चॅनेलवाले हिरो करतात.आयडॉल ठरवतात.खरे आयडॉल तर हलधर जी सारखे आहेत.चॅनेलवाल्याचे यांच्याकडे लक्ष कधी गेले तर



याना पद्मश्री जाहीर झाल्यावर ! श्री हलधर जी याची जीवनकहाणी तुम्हालाही प्रेरणा देऊन जाईल.म्हणून तर हि पोस्ट करतोय.ते एका अत्यंत गरीब कुटुंबातून आलेले,आईवडिलांचे निधन झाल्याने वयाच्या दहाव्याच वर्षी हलधर जी अनाथ झाले.त्यामुळे त्यांना इयत्ता तिसरीतच शाळा सोडवि लागली. पोटासाठी इतक्या लहान वयात ते ढाब्यावर खरकटी भांडी विसळण्याचे काम करू लागले.त्यानंतर एका गृहस्थाला त्याची दया आली व यांना एका शाळेच्या स्वयंपाक घरात काम मिळाले.तिथं थोडं स्थिरस्थावर आयुष्य त्यांना मिळालं.नंतर बँकेकडून त्यांनी शंभर रुपये कर्ज घेऊन पेन - पेन्सिल - शालेय वस्तूच्या विक्रीचे छोटेसे दुकान टाकले.आणि उदरनिर्वाह त्यातूनच भागवू लागले. आता त्यांच्यातील साहित्यिक कौशल्याबद्दल सांगतो. श्री हलधर जी यांनी १९९५ च्या सुमारास स्थानिक उडिया भाषेत राम शबरी सारखे काही धार्मिक प्रसंग निवडून त्यावर स्फुट लिहून ते लोकांना ऐकवू लागले. भावनेने ओथंबलेले त्यांचे ते शब्द ऐकताना लोक गुंग होऊन जायचे. पाहता पाहता त्यांच्या रचना प्रचंड लोकप्रिय झाल्या.हळूहळू ती कीर्ती सर्वदूर पसरू लागली. अनेक नामांकित लेखक कवींनी त्यांची दखल घेऊन विविध वृत्तपत्रातून त्यांच्याबद्दल भरभरून लिहिले. आणि अखेर दिल्लीपर्यंत त्यांची हि कीर्ती पोचली आणि त्यांना चक्क साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. अजून एक कहर म्हणजे स्वतः हलधर जी फक्त तिसरी पर्यत शिकलेलं पण आजमितीस पाच पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी त्यांच्या साहित्यावर पीएचडी करत आहेत.त्यांच्याबद्दल इतकंच म्हणावसं वाटत की,आप किताबो में प्रकृति को चुनते है पद्मश्री ने,प्रकृति से किताबे चुनी है।। डीडी क्लास : भोवती अनुकूल काहीच नसतानाही यश खेचून आणणारे, दगडालाही फोडून त्यातून बाहेर उगवून येणारे हलधर जी सारख्या लोकांची चरित्रे का वाचायची ? तर आपल्यात,आपल्या पुढच्या पिढीत त्यातूनच ऊर्जा यावी. सगळी परिस्थिती वाईट आहे. नाहीतर मी नक्कीच काहीतरी करून दाखवलं असत अशी कारणे देऊन निराश झालेल्यासाठीच हि आजची हलधर जी याची कहाणी तुम्हांपुढे ठेवली.शेवटी मी नेहमी सांगतो तेच आज पुन्हा सांगतो, काहीही होवो.....रडायच नाही तर लढायच आणि लढून जिंकायच..सचिन कांबळे अध्यक्ष,विश्ववेध बहुउद्देशीय विकास सेवाभावी संस्था लातूर यांनी ही लिहिलेली सत्यशोधक कथा प्रसिद्ध करावशी वाटली.

## विज्ञान शाखेचा व कला शाखेचा निकाल १०० %

# श्याम उच्च माध्यमिक विद्यालय दहिफळ (वड.) यांची बारावीच्या निकालाची यशाची परंपरा कायम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

तालुक्यातील दहिफळ (वड.) येथील शाम उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी कला व विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असुन विद्यार्थ्यांनी यंशाची परंपरा कामय ठेवली आहे.शाम उच्च विद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२४ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली असून केज तालुक्यातून विज्ञान व कला शाखेत निकालाचा उच्चांक प्राप्त केला आहे.म.रा.उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या वतीने फेब्रु/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये विज्ञान तसेच कला शाखेचा १००% टक्के निकाल लागला. या मध्ये विज्ञान शाखेत विशेष प्राविण्य मिळविणारे १४७ विद्यार्थी आहेत व प्रथम श्रेणीत ६६ विद्यार्थ्यी आहेत तर कला शाख्येत विशेष प्राविण्यासह ३५ विद्यार्थी आहेत. तसेच विज्ञान शाखेतून कु शेळके श्रावणी अनिल हीने ९२.००% घेऊन प्रथम क्रमांक पटकवला व चि. शेटे तुषार बालासाहेब ९१.००% घेऊन द्वितीय क्रमांक तर कु. थोरात श्रेया संतोष हिने ९०.००% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. तसेच कला शाखेतून कु. सुरवसे निकिता श्रीकिसन हिने ८४.००% घेऊन प्रथम क्रमांक पटकावला व चि. वरपे कृष्णा राजेंद्र याने ८२.११% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर चि. भोसले शेखर नारायण याने ८२.००% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला आहे .श्याम उच्च माध्यमिक विद्यालय दहिफळ (वड.) विज्ञान व कला शाखेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव श्री शरद बप्पा गदळे, संस्थेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर व शाळेच्या प्राचार्या जयश्री ईप्पर तसेच प्रा.अध्यापनाचे अतिशय महत्त्वाचे कार्य पार पाडणारे उपप्राचार्य गंदगे आर. व्हि., सोळंके पी.एस.,गपाट,एम. टी,. गायकवाड ,एम.जी.,राऊत टी. एम. मुंडे बी. एम. भालेराव डी. ए. कुटे व्ही. व्ही. सिरसाट एम. एस. खेडकर एच. बीं.मुंडे एस. पी. खाडे ए. एस.कदम मॅडम,मेहेत्रे मॅडम ,नागरगोजे आर. सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.





# दौंड मधिल प्रमुख नेत्यांच्या गावातील बँनरची तालुक्यात चर्चा

## रावणगाव मध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्याचा बोलबाला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

अठराव्या लोकसभेसाठी मतदान होत असताना, संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेला बारामती लोकसभा मतदारसंघ हा चर्चेचा विषय ठरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील उभ्या फुटी नंतर, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्यातील सरळ लढत लक्षवेधी ठरली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या दौंड विधानसभा मतदारसंघात, एकीकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुतांश पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते, पक्ष फुटी नंतर अजित पवार यांच्या सोबत गेले. विशेषतः दौंड तालुक्याच्या पूर्व भागात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासाठी नेतृत्त्वाची पोकळी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघाचे सरचिटणीस अजित आटोळे यांनी प्रतिकूल परिस्थितीत विरोधकांच्या कोणत्याही दबाव अथवा प्रलोभनाला बळी न पडता दौंड तालुक्यातील पूर्व भागात जिद्दीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रचार जवळपास एकहाती सुरू ठेवला.




आज त्यांच्या गावात रावणगाव( ता.दौंड)येथे त्यांनी, बारामती लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या विद्यमान खासदार आणि उमेदवार सुप्रिया सुळे यांचा निवडणुकीतील विजयाचा दावा करणारा फलक उभारला आहे. हा फलक रावणगाव आणि परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेत आहे. हा बँनर रावणगामध्ये तालुक्यातील मोठ्या पक्षातील प्रमुख नेत्यांच्या गावात लागल्याने मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.याचीच संपूर्ण दौंड तालुक्यात जोरात चर्चा चालू आहे.

## शिवा संघटना कंधार शाखेच्या वतीने

# ३० मे रोजी महात्मा बसवेश्वर जयंतीचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अखिल भारतीय वीरशैव शिवा संघटना कंधार तालूका शाखेच्या वतीने ३० मे रोजी ८९३ व्या क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीचे आयोजन निमित्त नुकतीच बैठक कंधार येथे संपन्न झाली.



सदर दिवशी भव्य रॅली,महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमा-पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे,सदरील जयंती समारोहास तालुक्यातील सर्व समाजबांधव, महात्मा बसवेश्वर प्रेमी यांनी शेकडोंच्या' संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती समारोह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

महात्मा बसवेश्वर जयंती समारोह समितीची पूर्वतयारी बैठक नुकतीच कंधार येथे पार पडली.या बैठकीस शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, जिल्हाध्यक्ष संभाजी पावडे, रविंद्र पांडागळे,वि.आ.प्र. शुभम घोडके, जिल्हा कार्याध्यक्ष गंगाधर मंगनाळे, जिल्हा उपाध्यक्ष धोंडीबा पांडागळे, माधव भालेराव संपादक सा.हिंदवी बाणाचे , जिल्हा उपाध्यक्ष शिवराज भोसीकर, जयंती मंडळाचे अध्यक्ष गणेश गोरे,सचिव सचिन घोडके, शिवा कर्मचारी महासंघाचे तालुका सल्लागार चंद्रकांत गोंड,तालुका संपर्कप्रमूख त्र्यंबक भोसीकर , अभिषेक येवले,नामदेव कल्याणकस्तुरे,बी.टी.भुरे बादल येवते यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते,

# पत्रकार अविशांत कुमकर यांची महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या राज्य प्रसिध्दी समितीवर निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

पुणे येथे १९ मे रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या सर्व उपसमित्या व पदाधिकारी सदस्यांची नियुक्ती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ.प्रा.चंद्रजीत जाधव यांनी जाहीर केली.आष्टी तालुक्यातील पत्रकार तथा खो-खो चे राष्ट्रीय खेळाडू पत्रकार अविशांत कुमकर यांची नियुक्ती करण्यात आली.



निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा एमॅच्युअर खो-खो असोसिएशन अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश शिंदे,कैलास गवते,सचिव विजय जाहेर, सहसचिव मनोज जोगदंड, नितीन येळवे,कोषाध्यक्ष योगेश सोळसे,बापूसाहेब तारुकर, विष्णू काकडे,गोकुळ रेंगे, नितीन काकडे,प्रफुल हाटवटे, नितीन पुटवाड,माधव जायगुडे, सुधीर हजारे,तुकाराम करंडे, विष्णू घोंगडे,डॉ.केतन गायकवाड,विजय अपसिंगेकर, प्रा.रवि खरात आष्टी तालुक्यातील सर्व पत्रकारांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी साहेबांची मातृभूमीला लाख मोलाची मदत-प्रा.अण्णासाहेब राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आमचे मार्गदर्शक,प्रेरणास्थान,आधारस्तंभ ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी साहेब यांचा दि.२१ मे २०२४ रोजी ६६ वा वाढदिवस होता,त्याप्रसंगी खूप दिवसानंतर त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा. त्याप्रसंगी साहेबांसोबत बराच वेळ मनसोक्त गप्पा झाल्या.त्यांचे मार्गदर्शन मिळाले सामाजिक कार्य करत असताना सामाजिक संस्थांना स्वतःचा अर्थार्जनाचा सक्षम पर्याय जवळ असला पाहिजे,असा सल्ला त्यांनी दिला बराच वेळ चर्चा झाल्या नंतर साहेबांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या मातृभूमीतील आयडियल सोशियल एज्युकेशन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील



विद्यार्थ्यांच्या बद्दल चौकशी केली. संस्थेची सद्य परिस्थिती याबद्दल चर्चा केली. आपल्या संस्थेच्या माध्यमातून परिसरातील प्रतिवर्षी १२० विद्यार्थ्यांना मोफत व सवलतीचे दर्जेदार शिक्षण देण्याचा उपक्रम चालू आहे. यासाठी संस्थेला प्रतिवर्ष १२,००,०००/- लक्ष रुपये खर्च येतो. यामुळे संस्थेला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे.

संस्थेत विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना भौतिक सुविधेत येणाऱ्या अडचणी सांगितल्या,त्यानंतर त्यांना बोलता बोलता विद्यार्थ्यांना शाळेत बसण्यासाठी बैठक व्यवस्था नाही असे सांगितले, त्यानंतर त्यांनी विचारले आपल्याला कसली बैठक व्यवस्था अपेक्षित आहे... त्यावर मी त्यांना शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी ३ विद्यार्थी प्रति डेस्क याप्रमाणे १२० डेस्क आवश्यक आहेत असे सांगितले. त्यावर त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता यावर्षी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक १२० डेस्क देण्याचा प्रयत्न करू असा विश्वास दिला. सुरुवातीला ३० डेस्क आपण देऊ! लवकरच उर्वरित डेस्कची ही सुविधा उपलब्ध करू असा शब्द साहेबांनी दिला.

साहेबांनी तात्काळ ३३०० प्रति डेस्क प्रमाणे ३० साठी १००,०००/- लक्ष रुपये देऊन संस्थेला गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरीव अशी मदत केली. साहेबांच्या या मदतीने बऱ्याच सर्वसामान्य,गोरगरीब,ऊसतोड कामगार,आर्थिक दृष्ट्या मागास,विधवा अपत्य,बालकामगार, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुलं, परिसरात गरजू विद्यार्थी यांना शिक्षण देण्यासाठी अजून मोठी ऊर्जा मिळाली. साहेबांची ही लाख मोलाची मदत आम्हाला कोटी मोलाची असेल. मातृभूमीतील विद्यामंदिर आपल्यामुळे या मदतीमुळे काही प्रमाणात सुसज्ज होत आहे. साहेब तुमच्या वाढदिवसानिमित्त तुम्हाला उदंड आयुष्य लाभो ही मातृभूमी परिवाराची परमेश्वरा चरणी प्रार्थना

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व गेवराई पत्रकार संघ गेवराई ची कार्यकारणी जाहीर

## ता.अध्यक्ष अंकुश आतकरे, सचिव तुळशीराम वाघमारे तर शहराध्यक्ष कैलास हातगुले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे सर विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांच्या आदेशाने विभागीय उपाध्यक्ष जेष्ठ पत्रकार सुनील पोपळे व जिल्हा उपाध्यक्ष सुनील मुंडे यांचे अध्यक्षतेखाली गेवराई तालुका कार्यकारणी जाहीर झाली. यावेळी सर्वानुमते तालुका अध्यक्ष म्हणून परत एकदा अंकुश आतकरे यांच्यावर जिम्मेदारी सोपवण्यात आली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा गेवराई व गेवराई पत्रकार संघ गेवराई या दोन्ही पत्रकार संघाची कार्यकारणी दि. २२ मे रोजी ज्येष्ठ पत्रकार तथा विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे व जिल्हा उपाध्यक्ष सुनील मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्वानुमते बिनविरोध अध्यक्ष म्हणून अंकुश आतकरे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष भागवत देशपांडे राजेंद्र नाटकर, सचिव तुळशीराम वाघमारे, शहराध्यक्ष कैलास हादगुले, कार्याध्यक्ष अनिल अगुंडे, कोषाध्यक्ष शिवनाथ काळे, सहकार्य अध्यक्ष सुदर्शन देशपांडे, सहकोषाध्यक्ष अरविंद कुलकर्णी तर सदस्य रामहरी काकडे, मधुकर फुले, आर.के. थोरात, सचिन नाटकर, गणेश वीर यांच्या निवडी करण्यात आल्या. याप्रसंगी नूतन तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे म्हणाले की, माझ्यावर परत एकदा तुम्ही जिम्मेदार टाकत मला अध्यक्ष केल्याने माझ्या पण जिम्मेदा-या आणखी वाढले आहेत. मी आजवर आपल्या संघातील सर्व पत्रकारांच्या अडीअडचणीला सामोरे जात होतो यापुढेही जाणार परंतु विशेषतः मी ग्रामीण भागातील पत्रकारांना जास्त प्राधान्य देणार असुन आपल्या संघाचे नाव लौकिक करण्यासाठी सदैव प्रयत्न करणार व सामाजिक कार्यात अग्रेसर राहणार आपल्या संघाच्या माध्यमातून अनेक आडल्या नडल्यांची कामे करणार व त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असे ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ पत्रकार सुनील पोपळे यांनी तर सूत्रसंचालन तुळशीराम वाघमारे व आभार प्रदर्शन सुनील मुंडे यांनी केले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904